# आंबेडकरवादी कवयित्रींची कविता

**प्रा.डॉ. गोविंद नामदेव रावळेकर**
मराठी विभाग प्रमुख
यशोदा गर्ल्स आर्टस् ॲन्ड कॉमर्स कॉलेज, स्नेहनगर,
वर्धा रोड, नागपूर—१५

**प्रस्ताविक —**

आधुनिक भारताचे आणि राज्य घटनचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या कर्तृत्वाने आणि विचारांने भारत देशातील लेकमानसात धम्म आणि लोकशाही या अतूट नात्याने त्यांनी माणूसकी शिकविली. जोपर्यंत सर्वसामान्य माणसातून जातीभेद, ही सामाजिक विषमता नष्ट होणार नाही तोपर्यंत आपण कितीही कायदे करू तरीही या कायद्याल मानणारे बुद्धीजीवी लोक तयार होणार नाही आणि माणूसकी ही सर्व भारतीयांची सामाजिक विषमतेला दूर करण्याची फार मोठी शक्ती आहे. पण हजारो वर्षाच्या मानसिक गुलामगिरीने त्रस्त लोकांच्या डोळयातून माणूसकीचे बीजारोपण करायला राज्य घटना ही खऱ्या अर्थाने तयार असल्याने यासाठी भारतीयांची सुपीक डोळे या प्रणाली ज्या वेळेस मानायला लागतील आणि अंगवळणी लावतील त्या वेळेस डॉ. बाबासाहेबांनी पाहिलेला आणि साकारलेला भारत हा खऱ्या अर्थाने साकार होणार.

अशा या विचारांची मायादिळी आंबेडकरवादी कवयित्री ही आपल्या कवितांतून साकार होण्यासाठी प्रयत्नशिल आहे. तिला अजून आपण मांडलेले विचार लोकांना कळत नसतील तरी सुद्धा ते विचार हे जीवंत ठेवण्यासाठी आपल्या काव्यातून परिपूर्ण विचार साकार करण्याचा मानस घेवून ती आंबेडकरवादी कवितेला माणूसकीच्या उंचीवर नेण्याच्या परिपूर्ण प्रयत्न करतांना दिसते.

**आंबेडकरवाद कवयित्री :**

'ज्योत्स्ना चाांदगुडे' यांनी आपल्या काव्यात 'स्त्री' विषयक विचार प्रकट करतांना धार्मिकतेच्या सानिध्यातील स्त्री आणि आधुनिक भारतातील स्त्री याविषयी आपले मत प्रकट करतांना त्या 'स्त्री' काव्यातून म्हणतात,

*''या भूमीवर जन्मा आली*
*एखादी झाशीची राणी*
*बाकी साऱ्या इथे जन्मल्या*
*कधी सीता कधी अहिल्या*
*एखाद्या रजियाचा दिसला*
*लढाऊ बंडखोरपणा*
*राधा अन् मीरेची तर*
*परंपरा अव्याहत आहे*
.........................
*पूनजर्न्म तर रोजचं आहे*
*स्त्री आविष्कार शक्तीचा*
*टाहो इंदिरेचा घुमत आहे*
*शेवाळलेल्या मन:पटलावर*
..........................
*आसवांची कहणी पुसण्या*

*नकोच दुर्गा नकोच पार्वती*
*लखलखत्या तलवारीची*
*मनामनातून उगवावी पाती*
*अस्मितेच्या मंत्रातून पेटावी*
*सावित्रीची क्रांतीज्योती*

कवयित्रीने आधुनिक विचाराचा वारसा घेत ज्या सावित्रीबाई फुलेनी खऱ्या अर्थाने मुलींना शिक्षणाची द्वारे उघडून दिली आणि मिथ्या गोष्टींना आणि पाखडी धार्मिक बबींना नाकारून शिक्षणानेच सर्व 'स्त्री'चे उद्धार होईल. ही बाब आजच्य आधुनिक स्त्रीला समजल्याने ती आता क्षितीच्या प्रवासाला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेच्या मार्गपथावर निघाल्यने 'स्त्री' जीवनात नवनवीन आशेची किरणे प्रकाशमान झालेली आहेत. हेच कवयित्रीला या कवितेतून मांडावयाचे आहे.

पुढच्या आंबेडकरवादी कवयित्री प्रतिभा अहिरे यांनी 'माझ्या देशात' या कवितेत त्यांनी अजून जाग आली नव्हती ती जाग आता येत आहे आणि आम्हावर होणारे अन्याय, अत्यचार मला डोळसपणे आता दिसायला लागलेल्या आहेत. त्या अन्याय, अत्याचारावर आता प्रहार करून अडीज हजार वर्षापूर्वीची लोकशाही पूर्ववत आणण्यासाठी आपल्याला बंड करावे लागले तरी चालेल या आशेने त्या आपल्या 'माझ्या देशात' या कवितेत ते म्हणतात,

*''सूर्याचे दरवाजे आमच्यासाठी उघडे*
*टाकण्याची प्रथा*
*केव्हाही नव्हती माझ्या देशात*
*परंपरेनेच घातलं जाई काळोख्याचं काजळ,*
*आमच्या डोळयात*
*................................*
*....... पाखरांच्या पायात बेडया न*
*घालण्याची प्रथा*
*केव्हाही नव्हती माझ्या देशात*
*आज डोळयातले काळोख गच्च नाले*
*वाहताहेत*
*पातळी ओलांडून धोक्याची*
*शक्यता आहे,*
*वाहतील जुन्या चौकटी दारांच्या*
*कोसळतील भिंती मोठ्ठाल्या जुनाट घरांच्या*
*उशीरानंच खरंतर*
*पण आमचेही डोळे येताहेत......''*

हजारो वर्षाच्या गुलामीला आता नष्ट करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर या प्रज्ञा सूर्याने नवी वाट दाखविली आहे. त्या वाटेवर येणारी उंच–उंच इमारतींना काही क्षणातच क्रांतीच्या गर्जनेने आणि विचारांच्या दिशेने उद्ध्वस्त करून मानवी कल्याणच्या दिशेने पुन्हा पुन्हा त्या उद्ध्वस्त इमारतीवर माणुसकीचा पताका लावू अशी आशावादी भूमिका कवयित्री या काव्यातून मांडतांना दिसते.

या कवयित्रीच्या कविता पाहतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी साहित्यिकांना सांगितलेले विचार ते म्हणतात, ''आपली लेखणी आपल्या प्रश्नांपुरती बंदिस्त करू नका. तिचं तेज खेडयापाडयातील अंधार दूर होईल असं पवर्तित करा. आपल्या या देशात उपेक्षितांचे, दलितांचे फार मोठं जग आहे हे विसरू नका. त्याच दु:ख, त्याची व्यथा नीट समजून घ्या आणि आपल्या साहित्याद्वारे त्यांचं जीवन उन्नत करण्यात झटा. त्यातच खरी मानवता आहे.''१ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ही दिलेली शिकवण खऱ्या अर्थाने कवयित्रीने आपल्या काव्यातून प्रकर्षाने प्रकट करतांना दिसतात.

पुढे आंबेडकरवादी कवयित्री उषा हिंगोणेकर यांनी आपल्या भावी पिढयांना

इशारा देतांना 'आता' या कवितेत त्या म्हणतात,

*''रस्त्या–रस्त्यावर*
*छुपे हल्लेखोर दबा धरून आहेत*
*पावलागणिक सुरूंग*
*पेरलेले आहेत*
*कुठल्याही क्षणी*
*आपण उद्ध्वस्त होऊ शकतो*
*हे ओळखूनच दोस्तहो !*
*आता रस्त्यावर यावे लागेल.*

'आता' या कवितेतून कवयित्रीने जाणिवपूर्वक आपल लक्ष केंद्रित केलं आहे, ते म्हणजे हजारो वर्षांच्या या गुलामगिरीला नष्ट करायचे असेल त आपण जे प्रयत्न चालविले आहे की, सामाजिक विषमता नको, स्त्री–पुरूष भेद नको, जातीभेद नको. या ठिकाणी 'समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय' या चतुर्थ सूत्रांची मुर्तमेढ करण्यासाठी आपल्याला वर्णभेदाच्या विळयाख्यातून बाहेर निघू न देण्याचे जे षडयंत्र चालू आहे ते नाकारून आपल्यावर लादलेली वर्णपद्धतीतून बाहेर पडण्यासाठी रस्त्या–रस्त्यावर उतरल्याशिवाय गत्यंतर नाही अशा आशावाद कवयित्री आपल्या कवितेतून प्रकट करतात. पुढे ते 'शस्त्र' या कवितेत आपले विचार प्रकट करतांना म्हणतात,

*''शस्त्र हाती घेतले*
*तेव्हा........*
*सागराला आली भरती*
*आकाश थरथरले*
*थरथरली धरती*
*या शस्त्राने*
*करेन शिरच्छेद त्याचा*
*ज्याने केल्या रक्तांच्या जाती*
*जातींच्या उभारल्या भिंती''*

कवयित्री उषा हिंगोणेकर यांनी जो शस्त्र उगारला आहे तो वैचारिकतेचा आहे. या वैचारिकतेने आपल्यावर होणारा अन्याय–अत्याचार आता कदापीही सहन करणार नाही ज्यामुळे माणसाला माणसांपासून जाती–जाती आणि रक्ताची नाती असे चित्र मानसिकदृष्टया दूर्बल केलेल्या पिढयांपिढया बरबाद केल्या आणि वर्णपद्धतीनी जातीभेदाच्या भिंती उभारल्या, या सर्वांचा निषेदच करीत नाही तर या वर्णपद्धतीतून बाहेर पडून ज्या धर्मामध्ये वर्ण, वर्ग या पद्धतीचे बिमोड करून सर्व मानव्य जाती ही एक आहे व त्याच्याा योग्यतेच्या बडावर आपली क्षितीचे गाठून या सामाजिक विषमतेचा बिमोड करणे हेच उद्देश ठेवून आपल्या सामाजिक, समता प्रस्थापित करणे अगत्याचे आहे. अशा आशावाद कवयित्री आपल्या 'शस्त्र' या कवितेतून मांडतांना दिसते. यावर अनंत राऊत म्हणतात ''विद्रोही मनाचा संताप क्रूर स्वरूपाचा नसतो तर तो मानवतेवरील निष्ठेतून आलेला असतो.''२ यावरून विद्रोह हा मानवतावादाला जवळ करत असतो.

पुढे आंबेडकरवादी कवयित्री धम्मज्योती शेगोकार कांबळे या आपल्या कवितेतून भान, ज्ञान, अभिमान, इच्छा, खरेखोटेपणाची जाण आणि स्वातंत्र्याची जाणीव व्यक्त करतांनाा 'जाण' या कवितेत ते म्हणतात,

*''गुलामी नको कोणाची*
*भान ठेवायचे आहे*
*दान नको कोणाचे*
*ज्ञान घ्यायचे आहे।*
*.... लाडीगोडीचे नाटक कशाला*
*जाण खऱ्या खोटयाची आहे*

*कुंपण फुलाचे कशाला*
*रान मोकळे करायचे आहे''*

या कवितेतून कवयित्रीने अस्मितेचे भान ठेवून सर्व मानव्य जातीला जगण्याची जाण देतांना माणूसकीचे धडे देण्याचे कार्य कवयित्री या कवितेतून मांडतांना दिसते.

यावर योगेंद्र मेश्राम म्हणतात, ''दयेचे दान देणे अथवा दयाशील कर्तव्य भावनेतून भिक्षा देवून गरीब माणसाला वाटेला लावणे हे भूत दयावादचे लक्षण. तर गरीब माणसाला काम देवून त्या कामाचा योग्य मोबदला देणेही बुद्धिवादाने केलेली कायम व्यवस्था असते. खऱ्या अर्थाने मानवतावादाचे हे लक्षण असते.''[३] या मानवतेवादाची जाणीव ठेवणे हे बुद्धिजीवीना अत्यंत गरजेचे आहे.

पुढे त्या 'संघर्ष' या कवितेत म्हणतात,

*''तुझ्या शब्दात.....*
*अन्यायाबद्दल भावा दिसून येते*
*तुला माहित नाही काय?*
*अन्यायातूनच संघर्षाची ज्योती पेट घेते!*

कवयित्रीने अतिशय कमी शब्दात मोठा आशय मांडलेला दिसतो. तो म्हणजे गुलामाला गुलामाची जाणीव करून दिल्यास तो बंड करून उठतो. या बाबासाहेब आंबेडकरांच्या वाक्यातून त्यांच्या विचारांच्या पगडा कवयित्रीच्या कवितेत विचार स्वरूपाने प्रकट होतांना दिसतो आणि म्हणूनच हजारो वर्षाच्या या गुलामीला झुंगारून आपल्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने आपल्यावर येणाऱ्या प्रत्येक संकटावर मात करण्याची शक्ती प्रदान करेल आणि या प्रगत ज्ञानानी आपलं जीवन प्रकाशित करून इतर अन्यायग्रस्त, अत्याचारग्रस्त जीवन जगत आहेत त्यांना माणूसकीची वाट निर्माण करण्यासाठी प्रवृत्त करून सामाजिक समता प्रस्थापित करू. अशा आशावाद कवयित्री या कवितेतून मांडतांना दिसतात.

**निष्कर्ष :**

आजच्या एकविसाव्या शतकात सारे जग आधुनिकतेबरोबर चालले असतांना मानसिकदृष्टया दुर्बल असणारे जे अमानवीय घटक समाजामध्ये वावरत आहे त्याचे प्रमाण हे आधुनिक विचारप्रणित लोकांपेक्षा जास्त प्रमाणात असल्याने आधुनिक किंवा पुरोगामी विचारप्रणाली अशा मानसिकदृष्टया दुर्बल घटकांवर हावी होताना दिसतात. कारण पुरोगामी विचारप्रणाली ही खऱ्या अर्थाने या धरतीवर जे काही जीवंत आहे तेच प्रमाण आहे, बाकी सर्व मिथ्या आहे, ही भूमिका घेणे ही आजच्या काळाची गरज झालेली आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या पुरोगामी विचारांची मुर्तमेढ रोवतांना प्रामुख्याने समाज, देश आणि जग या परिपेक्ष्यात जी मानवीय संस्कृती नांदते ज्यात माणूसकी असणे ही काळाची गरज असतांना काही मानसिक आजाराने किंवा धर्म वेडाने, कर्मकांडाने स्वत:ला श्रेष्ठ ठरवून मिथ्या व भ्रामक कल्पनांना अद्भूत शक्तीच्या द्वारा गुंतवून ठेवतात अशावर खऱ्या अर्थाने पुरोगामी विचारांची जाणीव करून देणे अगत्याचे ठरते आणि या विचाराने सारा समाज, देश आणि जग अहिंसेच्या आणि शांतीच्या मार्गानेच आपले पाऊल टाकून समाजात, देशात आणि जगात शांती नांदवून या एकविसाव्या शताकात माणसाला माणूसकीची वागणूक देवून समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय देवून लोकांनी,

लोकांकरिता आणि लोकांसाठी लोकशाहीची निवड खऱ्या अर्थाने जोपासणे ही आजच्या एकविसाव्या शतकाची गरज झालेली आहे.

हीच जाणीव आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेतून प्रकर्षाने येतांना दिसते.

## संदर्भग्रंथ सूची —

१) आंबेडकर भीमराव रामजी : जातिभेद निर्मूलन, भाषांतर, प्र. गांरजे मा. फ., अशोक प्रकाशन, नागपूर, १९७०.

२) मनोहर यशवंत : आंबेडकरवादी मराठी साहित्य, भीमरत्न प्रकाशन, नागपूर, प्र. आ. १९९९.

३) राऊत अनंत : 'विद्रोहमूल्य', कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. २००५.

४) मेश्राम योगेंद्र : दलित साहित्य : उद्गम आणि विकास, मंगेश प्रकाशन, नागपूर, प्र.आ. १९९८.

५) मेश्राम योगेंद्र (संपा.) : विद्रोही कविता, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९७८, दु.आ. १९८७.

६) लिंबाळे, शरणकुमार (संपा.) : 'दलित प्रेमकविता', प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ. १९८६.

७) भवरे, महेंद्र : 'दलित कविता आणि प्रतिमा', लोकवाङ्मय गृह, पहिली आवृत्ती, फेब्रुवारी २०१२.